


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे    अंक : ६६१. वा    बुधवार    दि. २४ जानेवारी २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# जिल्हा हादरला...एकाच वेळेस जिल्ह्यात ३ खून...

## सासऱ्यानेचं नातवासह गर्भवती सुनेची केली हत्या...

**जनसंचलन/ संग्रामपूर**

बुलढाणा जिल्ह्यात ३ खून झाल्याचे धक्कादायक घटना समोर आली आहे या घटनेमुळे संपूर्ण जिल्हा हादरला आहे. २३ जानेवारीच्या सकाळच्या सुमारास चिखली तालुक्यातील आसोला शिवारात एक तरुणीचा जाळून खून केल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेचे आरोपी शोधण्यात पोलीस व्यस्त असतानाच संग्राम पुरात दुहेरी हत्याकांडाची घटना समोर आली आहे. सासर्याने लहान चिमुकल्या नातवासह गर्भवती सुनेची कुऱ्हाडीने सपासप वार करून हत्या केली आहे. पोलिसांनी आरोपी सासर्याला अटक केली आहे. नारायण गायकी (६५) असे हत्या करणाऱ्या सासऱ्याचे नाव आहे. तर सून अश्विनी गणेश गायकी(३०) व समर्थ गायकी(१०) अशी मृतकांची नावे आहे. प्राप्त माहितीनुसार आरोपी नारायण गायकी हा दारूच्या व्यसनाच्या आहारी गेलेला आहे. २३ जानेवारीला दुपारी देवानंद गायकी यांचा मुलगा समर्थ हा शाळेतून घरी आला त्यावेळी घरगुती वादाचा राग मनात ठेवत आरोपी नारायण गायकी याने समर्थांच्या तोंडावर कुऱ्हाडीने वार केला या घटनेत तिचा जागीच मृत्यू झाला. सदर प्रकार पाहून समर्थ ची आई आरडाओरड करत बाहेर पळत गेली. मात्र नारायण गायकी यांची लहान सून आठ महिन्याची गर्भवती असल्याने तिला पळता आले नाही. सासऱ्याने काहीही विचार न करता लहान सून अश्विनीच्या अंगावर देखील कुराडीने सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत तिला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले मात्र वाटेतच तिचा मृत्यू झाला. या घटनेत दोघांचा खून झाल्याचे दिसत असले तरी अश्विनीच्या पोटातील नऊ महिन्याच्या बाळाचा देखील आईच्या पोटातच मृत्यू झाला जग पाहण्याच्या आधीच आजोबांनी त्याला जगातून उठवले या घटनेमुळे एकच हळहळ व्यक्त होत आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात येताच तामगाव पोलिसासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपी सासर्याला पोलिसांनी तत्काळ अटक केली असून वृत्त लिहीपर्यंत त्याच्या विरोधात गुन्हा नोंदणीची प्रक्रिया सुरू होती.





## जिल्हा हादरणारी दुसरी घटना आसोला शिवारात अत्याचार व मारहाण करून अनोळखी महिलेचे प्रेत जाळून हत्या...

**जनसंचलन/चिखली**

आसोला शिवारात अनोळखी युवतीची हत्या करून प्रेत जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना २३ जानेवारी रोजी उघडकीस आली. याप्रकरणी अंढेरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. चिखली ते अंचरवाडी रस्त्यावर आसोला शिवारात एका तरुणीचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळला. घटनेची माहिती मिळताच अंढेरा पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. घटनास्थळाला पोलिस अधीक्षक सुनील कडासणे, अपर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुने, उपविभागीय अधिकारी पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, अंढेराचे ठाणेदार विकास पाटील, पीएसआय हरिहर गोरे, मोरसिंग राठोड, गजानन वाघ, सोनकांबळे, गोरख राठोड, टेकाळे



आदींनी भेट दिली. मृत तरुणीचे वय १९ ते २५च्या दरम्यान आहे. या तरुणीची हत्या करून ओळख पटू नये, यासाठी मृतदेह जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, हा मृतदेह अर्धवटच जळाला. याप्रकरणी पुढील तपास अंढेरा पोलिस करीत आहेत. या अनोळखी युवतीचे ओळख पटवण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. पोलिसांनी घटनास्थळ परिसर पिंजून काढून काही पुरावे मिळतात का, याची चाचपणी केली. युवतीची ओळख पटू नये म्हणून चेहरा जाळून टाकण्यात आला आहे. त्यामुळे ओळख पटवण्यात अडचणी येत आहेत. या युवतीवर अत्याचार करून व जबर मारहाण करून त्यानंतर जाळले असावे, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. प्रेत जळलेले असल्याने तात्पुरते शवविच्छेदन जागेवरच करण्यात आले.

## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या



**जनसंचलन/ संग्रामपूर**

पिंगळी शिवारातील जंगलात एका ३० वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २१ जानेवारी रोजी सकाळी उघडकीस आली.संग्रामपूर तालुक्यातील रोहीणखिडकी (शेंबा) येथील दिनेश झिना बोंडळ या ३० वर्षीय युवकाने पिंगळी जंगलात एका झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत प्राप्त माहितीनुसार, गुमठी येथील एक वनमजूर पिंगळी शिवारातील जंगलात गस्तीवर असताना मयत दिनेश एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. वनमजुराने याबाबतची माहिती मृतक दिनेशच्या घरी दिली असता नातेवाइकांनी घटनास्थळी धाव घेतली. जोखलाल बोंडळ यांच्या फिर्यादीवरून सोनाळा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# युवक काम आटपून घरी निघाला वाटेतच अंधाराने केला घात...

**जनसंचलन/मोताळा**

सध्या अनेक ठिकाणी अंतर्गत रस्त्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यात ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे सूचना सावधानतेचे फलक लावण्यात आले नाही आहे. त्याचाच एक बळी बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यात गेला आहे. भरधाव दुचाकीचा अपघात झाल्याने २५ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना २१ जानेवारी रोजी रात्री मोताळा येथील ग्रामीण रुग्णालयासमोर निर्माणाधीन पुलाजवळ घडली. शे. अनसार असे मृतक युवकाचे नाव आहे. मोताळा तालुक्यातील कोथळी येथील शे. अनसार शे. मुसा हा २१ जानेवारी रोजी कामानिमित्त मोताळा येथे आला होता. येथील ग्रामीण रुग्णालयासमोर पुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे रस्त्यावर पुलाच्या दोन्ही बाजूंनी मध्य भागापर्यंत मुरुमाचा आडवा बांध टाकण्यात आलेला होता. शे. अनसार हा कॉटन मार्केट रोडवरून परत येत असताना रात्रीची वेळ होती. त्यामुळे पुलावर आडवा टाकलेला मुरुमाचा बांध त्याला अंधारात दिसला नाही. त्या बांधावरून शे. अनसारची दुचाकी जोरात आदळली. त्यानंतर दुचाकीवरील अनसार खाली फेकला गेल्याने त्याच्या डोक्याला जबर मार लागून तो गंभीर जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच बोराखेडी ठाणेदार सारंग नवलकर, नापोकॉ विजय पैठणे, पोकॉ अभिनंदन शिंदे, दीपक पवार यांनी घटनास्थळी धाव घेत अपघातातील जखमीला नागरिकांच्या मदतीने उपचारासाठी बुलढाणा येथे हलविले. तेथे डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.मोताळा येथील ग्रामीण रुग्णालयासमोर पुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे त्याठिकाणी मुरुमाचा आडवा बांध टाकण्यात आलेला आहे. याठिकाणी संबंधितांनी काम सुरू असल्याचे कोणतेही फलक लावलेले नाही. तसेच रात्रीची वेळ असल्याने मुरुमाचा आडवा बांध या दुचाकी चालकास दिसला नसल्याने हा अपघात घडला आहे. रस्त्याचे काम चालू असल्याचे फलक लावलेले असते तर दुचाकीचा अपघात घडला नसता. दुचाकी चालकाचे प्राण वाचले असते, असे सांगत मृतकाच्या नातेवाइकांनी संबंधित ठेकेदारावर रोष व्यक्त केला



आहे. या अपघातानंतर चौकशी करुन दोशींवर कारवाई करू, असे पोलिसांनी सांगितले आहे.मोताळा येथील ग्रामीण रुग्णालयासमोर पुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे त्याठिकाणी मुरुमाचा आडवा बांध टाकण्यात आलेला आहे. याठिकाणी संबंधितांनी काम सुरू असल्याचे कोणतेही फलक लावलेले नाही. तसेच रात्रीची वेळ असल्याने मुरुमाचा आडवा बांध या दुचाकी चालकास दिसला नसल्याने हा अपघात घडला आहे. रस्त्याचे काम चालू असल्याचे फलक लावलेले असते तर दुचाकीचा अपघात घडला नसता. दुचाकी चालकाचे प्राण वाचले असते, असे सांगत मृतकाच्या नातेवाइकांनी संबंधित ठेकेदारावर रोष व्यक्त केला आहे. या अपघातानंतर चौकशी करुन दोशींवर कारवाई करू, असे पोलिसांनी सांगितले आहे

# मेरा खुर्द येथे सचिव व सरपंच यांचा मनमानी कारभार...



**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यातील मौजे मेरा खुर्द येथील सचिव हे सतत गैरहजर असल्यामुळे मेरा खुर्द येथील विकास कामांना खीळ बसली आहे तसेच काही भागांमध्ये रोगराईने आपले डोके वर काढले आहे सचिव यांना फोन केला असता उडवडीचे उत्तरे देत आहे बारा दिवस झाले सचिव हे मेरा खुर्द येथे आलेच नाही त्यांना वारंवार विनंती करून सुद्धा त्यांनी मेरा खुर्द येथे आले नाही तसेच मेरा खुर्द सरपंच यांना सुद्धा आम्ही वारंवार विनंती केली असता त्यांनी सुद्धा कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद आम्हाला ग्रामपंचायत सदस्यांना दिला नाही त्यामुळे गावामध्ये लाईट व नालीसफाई इतर रोगराई यांनी चांगलेच डोके वर काढले आहे सचिव साहेब यांना विकास कामाबद्दल बोलले असता सदर कामाची डि एस सी ही बनली नाही त्यामुळे विकास कामे करता येणार नाही असे उत्तर देतात स सदर मेल हा मेरा खुर्द चे उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी एका मेल द्वारे सदर माहिती चिखली गटविकास अधिकारी यांना दिली आहे सदर निवेदनावर नंदू वराडे सुनील गवई शाईन परविन अशपाक शहा गौतम गवई मुख्तार मिस्त्री वैशाली बबन काळे सुमनबाई भास्कर गवई तसेच मेरा खुर्द येथील सुज्ञ नागरिक सर्जेराव गवई बाळू काळे यांनी सुद्धा निवेदनावर सह्या केलेले आहेत

# दुचाकीस्वारांना लुटणारा मिथुन जेरबंद




**जनसंचलन/ डोणगाव**

समृद्धी महामार्गावर असणाऱ्या लोणीगवळी रोडवरील पुलावर दुचाकीस्वारांना लुटणाऱ्या मिथुन चव्हाण नामक गुंडास जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, डोणगांव ते लोणी गवळी रोडवर समृद्धी महामार्गाच्या पुलापुढे २१ जानेवारी रोजी रात्री ८:१५ वाजेच्या सुमारास महावीर शंकर दळवी (घाटबोरी) आणि त्यांचे मित्र विनोद निवृत्ती देशमुख (आंधृड) हे दोघे शेतीचे साहित्य घेऊन जात असताना मिथून मधुकर (२५, रा. पांगरखेडा, जि. वाशिम) व अन्य दोघांनी महावीर दळवी यांची दुचाकी अडवून त्यांच्या व विनोद देशमुख यांच्या गळ्याला चाकू लावला. तसेच खिशातील ७०० रुपये जबरीने काढून घ्यायला लागला. यावेळी डोणगावचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांना संपर्क साधला असता, त्यांनी गस्तीवर असणारे बीट जमादार सतीश मुळे, आनंद चोपडे, पवन गाभणे, पुंडलिक वाळले यांना तत्काळ घटनास्थळी रवाना केले. त्यामुळे गावकऱ्यांच्या सहाय्याने मिथूनला पकडून डोणगाव पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

# उपप्रादेशिक परिवहन कार्यालयच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान...

**जनसंचलन/बुलढाणा**

नैसर्गिक आपत्तीमुळे होणा-या प्राणहानीपेक्षा रस्ते अपघाताच्या पाश्वभूमीवर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे यांनी सुरु झालेले २०२४ वर्ष हे अपघात मुक्त करण्याचे ठरवलेले आहे. आज दि २३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडी दाखवुन या रस्ता सुरक्षा अभियान बाईक रॅलीचा सुरुवात करण्यात आली आहे. संपूर्ण शहरात बाईक रॅली फिरवुन रस्ता सुरक्षा अभियानचे नियम नागरिकांना सांगण्यात आले आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने व अप्पर पोलिस अधीक्षक महामुनी यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बुलडाणा येथे भेट दिली. जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी




रस्त्यावर होणारे अपघात या विषयी नागरिकांना मार्गदर्शक केले.वाहन चालवितांना काय खबरदारी घ्यावी या विषयी त्यांनी मोलाचे मार्गदर्शक केले आहे.त्यानंतर वाहन चालविणा-या वाहन धारकांची त्या ठिकाणी नेत्र तपासणी करुन त्यांना चष्मे व सुरक्षेतेसाठी हेलमेटची वाटप केली आहे.१४ जानेवारी पासुन १५ फेब्रुवारी पर्यंत हा रस्ता सुरक्षा अभियानला सुरुवात झालेली असुन हा सप्ता १ महिना चालू राहणार असुन रस्त्यांवर होणा-या अपघाता विषयी माहिती देऊन सुरक्षेत वाहन चालविण्याचे धडे शिकविल्या जाणार आहे. वाहन चालवितांना नियमाचे पालन करावे असे आवाहन सुद्धा या वेळी करण्यात आले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नव मतदारांच्या टक्क्यात लक्षणीय वाढ-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## अंतिम मतदारयाद्या झाली प्रसिद्ध....



जनसंचलन/बुलढाणा

आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण करण्यात आले आहे. यासाठी विशेष पुनरीक्षण कार्यक्रम आणि घरोघरी सर्वेक्षणाची मोहिम राबविण्यात आली. या मोहिमांमुळे नवमतदारांनी उत्स्फुर्तपणे नोंदणी केल्याने नव मतदारांचा टक्का लक्षणीय वाढला असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दि. २७ ऑक्टोबर ते २३ जानेवारी २०२४ या कालावधीत राबविण्यात आला. दि. १ जानेवारी २०२३ ते ५ जानेवारी २०२४ या कालावधीत एकूण १ लाख ५ हजार ८८४ नवीन मतदार समाविष्ठ झाले आहेत. तसेच १ हजार ९०८ मतदारांच्या नावाची वगळणी झाली आहे. तसेच ३२ हजार ५११ मतदारांच्या तपशिलामध्ये दुरुस्ती झाली आहे. २०२४ च्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत २७ ऑक्टोबर २०२३ च्या प्रारूप मतदार यादीत ६१ हजार २७३ मतदारांची नाव नोंदणी झाली. तसेच ५० हजार ४२५ मतदारांची वगळणी करण्यात आली, त्यामुळे अंतिम मतदारयादीमध्ये १० हजार ८४८ मतदारांची निव्वळ वाढ आहे. एकूण मतदारांची संख्या पुरुष १० लाख ७० हजार १, महिला ९ लाख ७२ हजार १००, तृतीयपंथी ३० असे एकूण मतदार २० लाख ४२ हजार ९३१ इतके आहेत. जिल्ह्यातील मतदारयादीतील स्त्री-पुरुष गुणोत्तर ९०२ वरून ९०९ इतके झाले आहे. मतदारांचे प्रमाण १८+ लोकसंख्येच्या तुलनेत ९७.३३ टक्के इतके आहे. तसेच सदरच्या मतदारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ७० टक्के आहे. या पुनरिक्षण कार्यक्रमामध्ये १८ ते १९ या वयोगटामध्ये १९ हजार ५९ मतदारांची नव्याने भर पडली आहे. या वयोगटातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत २२.५५ टक्के युवक व युवतीचा मतदारयादीत नव्याने समावेश झाला आहे. प्रारूप पादीत १८ ते १९ या वयोगटाची मतदार संख्या ६ हजार ११८ (०.३४ टक्के) होती. ती २३ जानेवारीच्या अंतिम मतदार मादीत २५ हजार ९७७ (१.२७ टक्के) इतकी झाली आहे, तसेच २० ते २९ या वयोगटात २७ हजार २६ मतदारांची वाढ झाली आहे. या वयोगटातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ६६.७२ टक्के इतक्या युवक व युवतीचा मतदार यादीत नव्याने समावेश झाला आहे. २० ते २९ वयोगटाची प्रारूप यादीतील मतदार संख्या ३ लाख ७७ हजार ७४१, (१८.६० टक्के) होती, ती अंतिम यादीत ४ लाख ४ हजार ७६७ (१९.८२ टक्के) इतकी झाली आहे, अंतिम मतदारयादीमध्ये एकुण १४ अनिवासी भारतीय मतदार आहे. १४ हजार ६४ दिव्यांग मतदार आहेत. तसेच सेनादलातील ४ हजार ८०० मतदार आहेत. सदर सर्वेक्षणात आढळलेल्या मृत मतदार, कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार, तसेच दुबार मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्याची कार्यवाही पुनरीक्षण पूर्व कालावधी, तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कालावधीत पूर्ण करण्यात आला. त्यानुसार ३३ हजार ९१७ मृत मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली. त्याचप्रमाणे मतदार याद्यांमध्ये २१ हजार ८८९ एकसारखे फोटो असलेले मतदार असल्याचे निदर्शनास अले, त्यांची सखोल तपासणी करून विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कालावधीत ५ हजार ९५८ मतदारांच्या नावांची वगळणी करण्यात आली आहे. तसेच मतदार यादीत नाव व इतर काही तपशील समान असलेले ४ हजार ८३२ मतदार आढळून आले. तपासणी करून १ हजार ३१२ मतदारांची नावे वगळण्यात आली आहे.

# कालकथित शितल झोटे-जाधव यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त भोजन दान व वह्या पुस्तके वाटप...



जनसंचलन/ सिंदखेडराजा

मातृतिर्थ सिंदखेडराजा येथील रहिवासी माया सुरेश जाधव (मुंबई) यांची मुलगी दिवंगत शीतल सचिन झोटे- जाधव जमुना नगर जालना हिचे दि. २२जानेवारी २०२३ रोजी दुर्देवी घटनेत निधन झाले होते तिचा प्रथम स्मृतिदिनाचा योग साधून इतरत्र खर्च न करता दान परमिता हा बुध्दधम्माचा शंदेश घेवून जाधव कुटूंबांनी स्वागत बालक आश्रम कांदिवली (प) मुंबई येथील विध्यार्थ्यांना शीतल हीच्या स्मृतिप्रीत्यर्थ तिचे आई/बाबा माया सुरेश जाधव,भाऊ अँड. अनिकेत सुरेश जाधव, बहिण/ जीजाजी स्वाती वैभव बनसोडे यांच्या तर्फे भोजन दान तसेच शालेय साहित्य वह्या पुस्तके स्वागत बालक आश्रमात वाटप करण्यात आले. नंतर दादर चैत्यभूमीवर शीतल ही च्या स्मृतिप्रीत्यर्थ विधवत पूजा करून आदरणीय भंते यांना फलोहार व धम्म दान देण्यात आले. या प्रसंगी व्ही. जी.जाधव, नारायण म्हस्के,पत्रकार बाबासाहेब जाधव, विमल बाबासाहेब जाधव, सुभाष जाधव, पुष्पा सुभाष जाधव, पप्पू उर्फ शिवराम काळे, पुष्पा शिवराम काळे, सुभाष कस्तुरे, विजया सुभाष कस्तुरे, सचिन कस्तुरे , रामेश्वर जाधव, सुधाकर उबाळे,प्रविण उबाळे,हर्षदिप विद्याधर जाधव, उमेश जाधव इत्यादी उपस्थीत होते.

# उपविभागीय अधिकारी राष्ट्रीय महामार्ग उपविभाग खामगाव यांचा अजबच कारभार...



जनसंचलन/ चिखली

तालुक्यातील मौजे मेरा खुर्द येथे उपविभागीय अधिकारी राष्ट्रीय महामार्ग उपविभाग खामगाव यांच्या नियोजन शून्य कारभारामुळे या ठिकाणी जिथे बस स्टॉप आहे तिथे प्रवासी निवारे न बांधता २०० ते ३०० फूट बस स्टॉप सोडून समोर बांधले आहे तसेच मेरा खुर्द येथे नालीचे बांधकाम सुद्धा अर्धवट सोडलेले आहे रोडच्या पूर्व बाजूस नाली चे बांधकाम केलेले नाही व त्यावर धापे सुद्धा टाकलेले नाही सदर काम हे थातूरमातूर करून ठेकेदार हा अर्धवट काम सोडून गेलेल्या असल्याचे दिसून येत आहे खामगाव उपविभागीय राष्ट्रीय महामार्ग खामगाव यांनी पत्रामध्ये नमूद केले आहे की सदर प्रवासी निवारे हे तिथे बांधत असताना स्थानिक लोकांनी अडचणी निर्माण केले आहे तरी शासनाचे व प्रवासी चे जे मानसिक तान येत आहे व प्रवासी निवारण हे ज्या ठिकाणी पाहिजे त्या ठिकाणी न बांधता दुसरीकडे बांधल्यामुळे प्रवाशावर नाहक मनस्ताप होत आहे पाणी पाऊस आला असता त्या ठिकाणी बसण्याची कोणतीही व्यवस्था राष्ट्रीय महामार्ग उपविभाग खामगाव यांनी त्या ठिकाणी केलेली नाही त्यामुळे प्रवासीयांना मानसिक त्रास होत आहे त्या ठिकाणी दोन प्रवासी निवारे बांधणे आवश्यक असताना सुद्धा एक प्रवासी निवारा हा २०० ते ३०० फूट बस स्टॉप सोडून देऊळगाव राजा रोडच्या पूर्वे साईटला बांधला आहे त्यामध्ये एकही प्रवासी आज लोक विसावा घेताना दिसला नाही सदर प्रवासी निवाऱ्यामध्ये शासनाचे लाखो रुपये वाया झाले असल्याचे दिसून येत आहे तरी संबंधित विभागाच्या अधिकारी यांनी संबंधित ठेकेदार व संबंधित कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करून मेरा चौकी येथील प्रवासी निवारा योग्य त्या ठिकाणी व रोडच्या नाली चे राहिलेले अर्धवट काम त्वरित पूर्ण करावे अशी मागणी मेरा खुर्द परिसरातील लोकांची होत आहे रोडवरील अतिक्रमण काढण्याचे संबंधित ठेकेदाराला उपविभागीय राष्ट्रीय महामार्ग खामगाव यांनी कॉन्ट्रॅक्ट दिलेला आहे परंतु ठेकेदार हा कोणत्याही प्रकारचे त्या ठिकाणी काम करत असल्याचे दिसून येत नाही तरी संबंधित ठेकेदारावर योग्य ती कारवाई करावी असे मागणे सुद्धा मेरा परिसरातील लोकांची होत आहे असे पत्र उपविभागीय राष्ट्रीय महामार्ग खामगाव यांनी अंत्री खेडेकर येथील ग्रामपंचायत सदस्य सौ उषा राम माळेकर यांना पत्र देऊन माहिती कळवली आहे सदर पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी साहेब बुलढाणा कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग अकोला यांना सुद्धा पाठवण्यात आलेले आहे

# क्रांतिसूर्याला बुलढाणेकरांची अनोखी मानवंदना...

## महामानवांच्या पुतळ्याला अभिवादन करून काढण्यात आला कँडल मार्च...



जनसंचलन/बुलढाणा

क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांच्या कार्याला बुलढाणेकरांनी अनोखी मानवंदना दिली. स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगरमधील महामानवांच्या पुतळ्याला अभिवादन करुन रविवारी रात्री साडेआठ वाजता कँडल मार्च काढण्यात आला. क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सत्यशोधक चित्रपट एकाचवेळी राज्यातील १५० हुन अधिक चित्रपटगृहात ५ जानेवारी रोजी प्रदर्शित झाला. तेंव्हापासून बुलढाणा शहरातील एआरडी सिनेमॉल येथे हा चित्रपट हाऊसफुल्ल सुरु आहे. बुलढाणेकरांनी रविवारी २१ जानेवारी रोजी रात्री महामानवांच्या पुतळ्याला अभिवादन करुन एआरडी सिनेमॉलपर्यंत कँडल मार्च काढून क्रांतिसूर्याला अनोखी मानवंदना दिली. रात्री आठ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरमधील तथागत गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून हा कॅन्डल मार्च काढण्यात आला. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले व माता सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा परिधान आली होती. हाती क्रांतीची मशाल आणि मेणबत्ती घेऊन महिलांनी सहभाग घेतला.

# पंतप्रधान मोदींची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी कदापि होणे नाही– उद्धव ठाकरेंनी ठणकावलं

वृत्तसंस्था/ नाशिक

ज्यांनी तुम्हाला गादीपर्यंत पोहोचवलं, त्यांचंच वचन मोडणारे तुम्ही रामभक्त कसे काय होता? असा सवाल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी विचारला. नाशिकमध्ये सुरु असलेल्या शिवसेनेच्या राज्यव्यापी अधिवेशनात ठाकरेंनी भाजप आणि शिंदे गटावर हल्लाबोल चढवला. कोणीतरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बरोबरी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केली. अजिबात नाही, त्रिवार नाही... शिवरायांशी तुलना कदापि शक्य नाही, असं ठाकरेंनी ठणकावून सांगितलं.

जसे संत रामदास स्वामींचे मनाचे श्लोक होते, तसेच संजय राऊत यांनी सामनाचे श्लोक सांगितले. श्रीरामाचा अनुयायी म्हणून माझा उल्लेख केला, त्याबद्दल मी आभारी आहे. प्रभू रामचंद्र यांच्याकडून संयम, एकवचनी, एकपत्नी हे गुण घेतले. आता रावणाचे मुखवटे फाडायचे आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले.कालच्या सोहळ्यात कोणीतरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बरोबरी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केली. अजिबात नाही, त्रिवार नाही... शिवरायांशी तुलना कदापि शक्य नाही, असं म्हणत गोविंदगिरी महाराजांनी केलेल्या तुलनेवरुन ठाकरेंनी ताशेरे ओढले. जर छत्रपती शिवाजी महाराज नसते, तर आज राम मंदिर उभं राहिलं नसतं. नरेंद्र मोदी इतक्या वर्षात अयोध्येला गेले नव्हते, जगभर फिरले, लक्षद्वीपला गेले, पण मणीपूरला गेले नाहीत, अयोध्येत गेले नाहीत, कदाचित जसे आमचे फडणवीस गेले होते, तसे मोदी पंतप्रधानपद मिळण्याआधी गेले असतील, असा टोलाही उद्धव ठाकरेंनी लगावला.आपला इतिहास आहे, जो महाराष्ट्रावर आला, त्याला महाराष्ट्राने मूठमाती दिली. मग तो अफझलखान असो किंवा औरंगजेब. प्रभू रामचंद्र ही कोणा एका पक्षाची प्रॉपर्टी नाही. नाहीतर आम्हालाही भाजपमुक्त प्रभू श्रीराम करावा लागेल. जय श्रीराम ऐवजी भाजपमुक्त जय श्रीराम म्हणावं लागेल. प्रभू रामचंद्र एक सत्यवचनी होते. मग तुम्हाला गादीपर्यंत पोहचवणाऱ्यांचं वचन मोडणारे तुम्ही रामभक्त कसे काय होता? राम की बात झाली, काम की बात करा, काँग्रेस सोडा, गेल्या दहा वर्षात तुम्ही काय केलंत? असा सवाल ठाकरेंनी विचारला.



# खोटे गुन्हे दाखल करून शेतकऱ्यांचा आवाज दाबता येणार नाही - रविकांत तुपकर...

## एल्गार परिवर्तन मेळाव्याला संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर व सनाळा येथे प्रचंड प्रतिसाद

जनसंचलन/ संग्रामपूर

शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी गेल्या ३ महिन्यांपासून आम्ही रस्त्यावरची लढाई लढत आहोत. या लढाईत आम्हाला शेतकरी, तरूण व सर्वसामान्यांचा भरभक्कम पाठिंबा मिळत असल्याने अनेकांच्या पाया खालची वाळू सरकली आहे. त्यामुळे आमच्यावर खोटे गुन्हे केले जात आहेत. काही सत्ताधारी नेत्यांच्या आदेशावरून खोटे गुन्हे दाखल करून अटक करण्याचा घाट घातला जात आहे. परंतु असे कितीही खोटे गुन्हे दाखल केले, तरी शेतकऱ्यांचा हा आवाज दाबता येणार नाही,असे प्रतिपादन शेतकरी नेते रविकांत तुपकरांनी संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर व सोनाळा येथील एल्गार परिवर्तन मेळाव्यांत केले.




# ट्रकची दुचाकीला जोरदार धडक एक ठार,एक जखमी

जनसंचलन/ जळगाव जामोद

नांदुरा रोडलगत असलेल्या महाराष्ट्र बँकेसमोर ट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत एक इसम जागीच ठार तर एक इसम गंभीर जखमी झाल्याची घटना २३ जानेवारी रोजी घडली. २३ जानेवारी रोजी दुपारी जळगाव शहरातील महाराष्ट्र बँकेसमोर ट्रक (एम.एच.२८-७८८९) चालकाने दुचाकीला जोरदार धडक दिली. यामध्ये भिंगारा येथील दुचाकीस्वार जागीच ठार झाला तर भेंडवळ येथील वासुदेव सोनोने (वय ६२) गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर जळगाव ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना खामगाव येथे रेफर करण्यात आले आहे. ट्रक पोलिस स्टेशन जळगाव जामोद येथे जमा करण्यात आला आहे.




बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
• कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
• अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
• लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
• संधीवातावर उपचार
• गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
• फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
• मणक्यातील आजारावर उपचार
• दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
• कंबरेचे व मानेचे दुखणे
• पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# जळगाव जा. येथे २७ हजार रुपयांचा गुटखा पकडला

जनसंचलन/जळगाव जामोद

खांडवी- पिंपळगाव काळे रोडवरील मंदिराजवळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका व्यक्तीला मोटरसायकलवर गुटखा विक्री करताना २१ जानेवारी रोजी सकाळी अटक केली. त्याच्या जवळून २७ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला पिंपळगाव काळे ते खांडवी मार्गावर मोटरसायकलवर एक तरुण गुटख्याची वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पिंपळगाव- खांडवी रोडवरील मंदिराजवळ आरोपीची मोटरसायकल थांबवून झडती घेतली. त्याच्याजवळून २७ हजार दोनशे रुपयांचा गुटखा व एक मोटारसायकल जप्त करण्यात आली. पिंपळगाव काळे येथील आरोपी ऋषिकेश दिलीप गांधी (वय २१ वर्ष) याला अटक करण्यात आली. आ रोपी ऋषिकेश गांधीच्या विरोधात कलम ३२८, १८८, २७२, २७३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे कर्मचारी व स्थानिक जळगाव जामोद पोलीस स्टेशनचे पोलीस हेडकॉन्स्टेबल उमेश शेगोकार, सचिन राजपूत, स्वप्निल मस्के, संदीप रिंढे यांनी कारवाइ केली. पुढील तपास ठाणेदार आनंद महाजन यांच्या मार्गदर्शनात पीएसआय अमोल पंडित करीत आहेत. तालुक्यात मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री होत असल्याचे चित्र आहे.

